**वृत्त विशेष :**

# महाराष्ट्र हुंडाविरोधी आघाडीचे युवा आकांक्षा संमेलन

विदर्भातील बऱ्याच तालुक्यांमध्ये मार्च १९८० पासून हुंडाविरोधी आघाडीचे काम चालू झाले आहे. या हुंडाविरोधी आघाडीमध्ये प्राध्यापक, विद्यार्थी, सुशिक्षीत युवक युवतीचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. हुंडाविरोधी आघाडीची स्थापना ही हुंडयाच्या प्रश्नापुरती मर्यादित झालेली नाही. तो युवा पिढीचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे हे जाणून व ते निमित्त साधून सामाजिक अन्यायाचे निराकारण करण्याच्या या दीर्घ प्रक्रियेत जास्तीत जास्त तरुणांना सामील करून घेण्याचा हा अखंड प्रयत्न आहे. या अखंड प्रयत्नाचा भाग म्हणून २० सप्टेंबरला हुंडाविरोधी आघाडीने युवा आकांक्षा संमेलन नागपूरच्या पूर्णचंद्र बुटी सभागृहात आयोजित केले होते.

२० सप्टेंबरला युवा आकांक्षा संमेलन असले तरी खऱ्या अर्थाने या समेलनाचा प्रारंभ रविवार दिनांक १३–९–८१ रोजी हुंडाविरोधी सप्ताहाच्या उद्घाटन रूपाने झाला. त्यानिमित्ताने 'हुंडाविरोधी समस्या व स्त्रियांवरील अत्याचाराची समस्या व कायद्याची उपयुक्तता' या विषयावर परिसंवाद झाला. त्याच्या प्रमुख पाहुण्या खा. मोहसिना किडवाई होत्या. या परिसंवादात खा. श्री. बा. धाबे, खा. रामभाऊ म्हाळगी, खा. मार्गारेट अल्वा, खा. प्रमिला दंडवते, खा. उषा चौधरी, खा. गीता मुखर्जींनी भाग घेतला.

मंगळवारी १५ सप्टेंबरला हुंडाविरोधी चित्र-प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. याचे उद्घाटन खासदार श्रीमती कृष्णा साही ह्यांनी केले.

दि. २० सप्टेंबरला दिवसभर युवा आकांक्षा संमेलन झाले. याच वेळी नव्या दुनियेचा संकेत या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. अर्थतज्ञ वि. म. दांडेकर ह्यांनी भाषण केले. आजची शिक्षणविषयक परिस्थितीचे विवेचन करून मी लढणाऱ्या युवकांबरोबर येण्यास तयार आहे असे त्यांनी सांगितले.

सभारंभाचे अध्यक्ष विद्या बाळ ह्यांनी स्त्रीला माणूस मानण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे माणूस मानून समता आणण्याची गरज आहे. स्त्रियांचा प्रश्न या व्यवस्थेशी निगडीत आहे, असेही सांगितले. त्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले. त्यानंतर आमच्या पिढी पुढील सामाजिक आर्थिक आव्हाने या विषयावर परिसंवाद झाला. त्यामध्ये लता भिसे, भास्कर भोले, शेखर सोनाळकर, रजिया पटेल, प्रा. रमेश दहिवडे, डॉ. नीलम गोऱ्हे, प्रा. श्याम मानव, सिस्टर खंडागळे इत्यादींनी भाग घेऊन शिक्षण, राजकीय भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, धर्मांधता, बेकारी, इत्यादी आव्हाने असल्याचे सांगितले. परिसंवादानंतर गटवार चर्चा झाली. गटवार चर्चेसाठी चार विषय होते.

१) स्त्रीमुक्ती आणि युवक युवती

२) हुंडापद्धती व युवा पिढीची जबाबदारी

३) युवकांमध्ये पुरोगामी व सुधारणावादी विचार कसा पोहोचवावा.

४) युवकांमध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जाणीव कशी पोहोचवावी. या चारही गटात मिळून एकूण २५० युवक युवतींनी सहभाग घेतला.

या गटवार चर्चेनंतर आंतरजातीय विवाह केलेल्या युवक युवतींचा सत्कार करण्यात आला.

जननाटयसंघाचे 'लडका बेचना है' पथनाटय त्याच प्रमाणे अनुराधा जोशी दिग्दर्शित 'अनुत्तरित' ही एकांकिका सादर करण्यात आली.

हुंडाविरोधी आघाडीने अशा तऱ्हेने संमेलन भरवून अन्य सामाजिक प्रश्नावरही जागृती करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो नक्कीच स्तुत्य आहे. गटवार चर्चांमध्ये चर्चेला वेळ अपुरा पडल्याचं सर्वच युवक युवतींना जाणवत होतं. राजकीय भ्रष्टाचार, बेकारी, स्त्रियांवरील अन्याय अत्याचार अमानुष चालीरीती इ. विरोधी पथनाटये, शिबिरे, नियतकालीके, चर्चामंडळे काही आंदोलनात्मक कार्यक्रम इ. द्वारा युवकांमध्ये पुरोगामी सामाजिक राजकीय जाणीवा निर्माण केल्या पाहिजेत असा सर्वच गटचर्चांमधून आलेला सूर होता. प्रा. रूपा कुलकर्णी व सहकाऱ्यांनी हे संमेलन यशस्वी रितीने घडवून आणले.

– बायजा प्रतिनिधी

( पान ८ वरून चालू )

कैवारी म्हणून ओळखले जाते. स्त्रियांच्या अज्ञानाचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी स्त्री–शिक्षणास प्रारंभ केला. प्रतिकूल परिस्थिती असतानाही मोठ्या जोमाने बऱ्याच शाळा चालविल्या. विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले आहेत. सन १९६४ साली अशा प्रकारचा विवाहही घडवून आणला. जीवनात फसलेल्या स्त्रियांसाठी बालहत्त्या प्रतिबंधक गृहाची सोय केली. काशिबाई या ब्राम्हण विधवेला आत्महत्त्येपासून परावृत्त करुन या महापुरुषाने तिच्या प्रसूतीची व्यवस्था स्वतःच्या घरी केली. या कार्यामध्ये त्यांची पत्नी सावित्रीबाईचीही त्यांना खूप मदत झाली. कुटुंबप्रमुखांची हुकूमशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी, हा खरोखरच सामाजिक विषमतेचा, गुलाम गिरीचा मूळ आधार आहे. तो तोडल्या खेरीज स्त्री–पुरुषात समानता येणार नाही. हे फुल्यांनी ओळखले म्हणूनच त्यांनी या कार्यासाठी आपल्या आयुष्याची आहुती दिली आहे गो. ग. आगरकर, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई यांचीही कामगिरी अशीच उल्लेखनीय आहे. स्त्रीची प्रतिष्ठा, दर्जा, स्थान यावर राष्ट्राची उन्नती अवलंबून असते म्हणूनच आगरकर स्त्री-शिक्षणाच्या पाठिमागे लागले. कर्वे यांनी विधवा पुनर्विवाह विषयक चळवळीला स्वतःच्या कृतीने चालना दिली तसेच अनाथबालिकाश्रमाची स्थापना करून स्त्री पुढील अनेक समस्या दूर केल्या. याचप्रमाणे म. गांधी, ईश्वरचंद्र विद्यासागर इ. चे परिश्रम स्त्रियांच्या विचार जागृतीस उपयुक्त ठरले आहेत.

## ग्रंथ–नियतकालिकांची कामगिरी:–

स्त्री–विषयक सुधारणांना, चळवळींना ज्याप्रमाणे अनेक थोर समाजोध्दारकांनी हातभार लावला त्याप्रमाणेच ग्रंथांची, नियतकालिकाची कामगिरी या संदर्भात मोलाची ठरली आहे. बाळकृष्ण बाळ याचे विधवा संकट निवारण हे आठ पानीच पुस्तक आहे परंतु त्यामध्ये केशवपन विषयीचे विचार मोठ्या मार्मिकपणे माडलेले आहेत. याचप्रमाणे रा. मि. जोशी (पुनर्विवाह चालू करण्याची कारणे) व गोविंदकृष्ण टिळक (विधवा विवाह निषेध) या ग्रंथांनी तत्कालीन समाजातील अनिष्ट चालींवर परखडपणे प्रकाश टाकला आहे विधवा दुःख निवेदन, हिंदू विधवांचा धर्म विधवा विवाह वाद इ० ग्रंथानीहा विधवांच्या वेदना, दुःखे समाजातील खालच्या स्तरापासून उच्च स्तरापर्यंत पोहचविली आहेत. स्त्री–विषयक नियत कालिकांनी तर स्त्रियांची करुणावस्था घरोघरी पोहचविली आहे स्त्री–भूषण, त्रिविधज्ञान विस्तार, अबलामित्र, स्त्री शिक्षण चंद्रिका, आर्यभगिनी इ. नियत कालिकांनी स्त्रियांच्या उन्नतीला, विकासाला प्रेरणा दिली आहे. त्यांच्या दास्याचे आवेशाने विवेचन केले आहे. समाजात घडणाऱ्या घटना सत्यरूपाने जशाच्या तशा निदर्शनास आणल्या आहेत. म्हणूनच ग्रंथांची आणि नियत कालिकांची कामगिरी स्त्री विचार जागृतींस प्रेरक ठरलीं आहे.

## समारोप :–

आजचीं स्त्री थोडीफार सुशिक्षित सुसंस्कृत झालेली आपणास पहावयास मिळते. शिक्षण क्षेत्रातील अनेक बरे वाईट अनुभव तिने घेतलेले आहेत. काही उच्च पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. सार्वजनिक क्षेत्रात सभा समारंभात ती हिरीरीने भाग घेत आहे. साहित्याच्या क्षेत्रात तिने पदार्पण करून समाज मनाचीं चांगली पकड घेतली आहे. राजकारणात राजकीय चळवळीतही तिने प्रतिनिधीत्व केले आहे. स्वतःच्या मुक्तिसाठी ती संघटना बांधत आहे. संप, मोर्चा, चळवळीं यांचे नेतृत्व तिने स्विकारलेले आहे. म्हणून स्त्री वर्ग पूर्णतः जागृत झाला आहे असे म्हणता येत नाहीं वरील परिस्थिती केवळ कांहीं अशी शहरी विभागातच पहावयास मिळते. ग्रामीण जीवनातील स्त्री अद्यापही अज्ञातवासच भोगत आहे. तिला संप मोर्चा माहित नाही. शिक्षणाचा गंध नाही तर चळवळ म्हणजे काय ? ती कशा करता असते. हे दूरच राहिले.

आजची स्त्री-जीवनात झालेली थोडीशी उत्क्राती एका एकी झालेली नाही. कारण यासाठी विविध संघटना, चळवळी, सभा, परिषदा, विचारवंत, समाज–

( पान ३७ वर चालू )